पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम
कारंजा रोड,सिव्हील लाईन,वाशिम, ता जि वाशिम
कार्यालय दुरध्वनी क्र.०७२५२–२३४८३४
ई–मेल sp.washim@mahapolice.gov.in
Website:-www.washimpolice.gov.in

****

प्रेस नोट ०३/२१

दिनांक :– ०१/१२/२०२१

**पोलीस अधिक्षक घेतला ऑनलाईन दरबार–२०४ अधिकारी/अंमलदार यांनी मांडल्या अडीअडचणी.**

जिल्हा पोलीस अधिक्षक वाशिम यांनी जिल्हा पोलीस दलाचा पदभार स्विकारल्यानंतर पोलीस अधिकारी/अंमलदार यांच्या अडी–अडचणीचे व तक्रारीचे निवारण करण्याकरीता विशेष भर दिला. पोलीस पदोन्नती, आंतर जिल्हा बदलीवर वाशिम जिल्हयात बाहेरुन येणारे तसेच वाशिम जिल्हयातुन इतर जिल्हयात बदलुन जाणाऱ्या अंमलदार यांच्या अर्जाचा आढावा घेतला.

पोलीस अधिकारी/अंमलदार हे पोलीस स्टेशन येथे दिवसपाळी रात्रपाळी कर्तव्य बजावुन त्यांना इतर बंदोबस्त सारखे कर्तव्य चोख पार पाडावे लागते. आपल्या वैयक्तिक अडचणी याकडे प्रत्येक वेळेस पोलीस अधिक्षक कार्यालय येथे येऊन त्याचा पाठपुरावा करणे शक्य होत नाही म्हणुन मा. बच्चन सिंह पोलीस अधिक्षक वाशिम यांनी आज दिनांक ०१/१२/२०२१ रोजी १३.०० वाजता ऑनलाईन (गुगल मेट) व्हिडीओ कॉनफरन्सचे आयोजन केले होते. त्यात सर्व ठाणेदार यांनी त्यांचे अधिपत्याखाली कार्यरत अधिकारी/अंमलदार यांचे सह आपआपल्या पोलीस ठाण्यात हजर राहुन व्हिडीओ कॉनफरन्सद्वारे दरबाराकरीता हजेरी लावली. ऑनलाईन दरबाराकरीता सर्व पोलीस स्टेशन, शाखा येथील ३३ अधिकारी १७१ अंमलदार हजर होते.

ऑनलाईन दरबारात महत्वाचे मुदयांवर पोलीस अधिकारी/अंमलदार यांनी आपआपल्या अडीअडचणी मांडल्या त्यात वेतननिश्चीती,एरीअर्स,वैदयकिय बिल पदोन्नती,टि.ए.बिल,कोणत्याही कर्जाविषयी,धनार्जित रजा,साप्ताहिक सुटटी,कर्तव्याचे तासाबाबत तसेच पोलीसांच्या इतर समस्या आणुन घेतल्या. तसेच त्या समस्यांचा आढावा घेऊन एकुण २१ पोलीस अधिकारी/अंमलदार यांच्या तक्रारी प्राप्त झाल्या. त्या समस्या ३ दिवसात सोडविण्याचे आश्वासन दिले. तसेच नमुद तक्रारीचा पाठपुरावा करुन त्यावर काय कार्यवाही करण्यात आली, काय कार्यवाही चालु आहे किंवा कार्यवाही होऊ शकते किंवा नाही या बाबत आढावा घेऊन त्याबाबत अहवाल सादर करण्याबाबत पोलीस निरीक्षक कल्याण शाखा यांना आदेशित केले. तसेच इतर काही तक्रारी असल्यास समाधान हेल्पलाईनचा उपयोग करण्याबाबत सुचित केले. तसेच प्रशासकीय प्रत्येक डेस्कच्या कामकाजाबाबत ऑनलाईन लिंक पाठवुन फिड बॅक घेण्यात आला. त्या दरम्यान २२६ अधिकारी/अंमलदार यांनी प्रशासकीय कामकाजाबाबत अभिप्राय (तक्रारीचा) दिला. तक्रारीचे निवारण व मंत्रालयीन कर्मचारी यांचे कामकाजामध्ये सुधारणा करण्याबाबत सुचना दिल्या.

पोलीस स्टेशन स्तरावर कामकाज करत असताना अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करुन कामकाजामध्ये सुसंगतपणा आणुन जलदगतीने प्रकरणे निकाली काढण्याबाबत मार्गदर्शन केले. तसेच कोरोना रोगाच्या तसेच येणार ओमीक्रॉन व्हेरियंट याचेबाबत दक्षता घेऊन कोव्हीड १९ चे त्रिसुत्री – नियीमत सॅनीटायझर वापरणे,सोशल डिस्टसिंग पाळणे, नियमित मास्क वापरणे याबाबत सुचना दिल्या.

नमुद ऑनलाईन व्हिडीओ कॉनफरन्स दरबाराकरीता मा.बच्चन सिंह पोलीस अधिक्षक वाशिम यांचे मार्गदर्शनात,मा.गोरख भामरे अपर पोलीस अधिक्षक,उपविभागीय पोलीस अधिकारी यशवंत केडगे मंगरुळपीर–वाशिम,प्रभारी उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल ठाकरे कारंजा,प्रभारी पोलीस उपअधिक्षक गृह सुनिल हुड, सर्व ठाणेदार, सर्व शाखांचे प्रभारी हजर होते.

(सुनिल हुड)
प्र.पोलीस उपअधिक्षक गृह,वाशिम